# वेध २०१४ --- धनश्री केतकर

'मला डॉक्टर व्हायच होत त्याप्रमाणे मी डॉक्टरच झाले.'

किवा

'नट होण्याच न ठरवताच मी नट झालो .'

असे आपल्या करीयर बद्दल दोन टोकांचे विचार असू शकतात .पण जी इच्छा मनात बाळगली आणि ती पूर्णही केली अशा लोकांना आपण २०१४ च्या 'ठाणे वेध' मध्ये भेटलो. ती पूर्ण करण्यासाठी लागणारी जिद्द , साहस , चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या सहाय्याने त्यांनी हा प्रवास केला. सगळ्यांनी असे म्हटले की प्रवास अजून चालूच आहे आणि या प्रवासातही आनंद आहे.

(MKCL) चे प्रमुख **विवेक सावंत** यांनी त्यांच्या बीजभाषणात वेगवेगळी उदाहरणे देऊन अनेक मुद्दे मांडले. जेव्हा एखादी गोष्ट मिळवण्याची इच्छा आपल्याला होते तेव्हा ती मिळवण्याची तीव्र भावना , जिद्द, उत्साह, ध्यास , आशावाद याबरोबर उद्दिष्टांची जाण आणि नियोजन व योग्य साधनाची निवड हे सर्व जरुरीचे आहे. (MKCL) साठी त्यांनी 'bigger,better,cheaper,faster,wider,deeper and for achieveing this becoming smarter' हे उद्दिष्ट ठेवले. त्यासाठी कठोर परिश्रम करायला हवेत . 'Outliers' पुस्तकाचा लेखक Gladwel ने अनेक उदाहरणातून हे दाखवून दिले आहे की यशस्वी होण्यासाठी कमीतकमी दहा हजार तास सराव करणे आवश्यक आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा करताना अपयश आले तरी खचून न जाता सकारात्मक दृष्टीकोन हवा . मार्टिन ल्युथर किंगच्या 'We shall Overcome' या सुप्रसिद्ध वचनाची तसेच एडिसनला प्रयोग करताना आलेल्या १७८४ अपयशांची त्यांनी आठवण करून दिली. काहीही करण्यापूर्वी आपल्या क्षमता ओळखणे यालाही महत्व आहे.

आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्वयंशिस्त हवी व वेळेचे व्यवस्थापनही करता यायला हवे. अनपेक्षित प्रसंगांना तोंड देण्याची तयारी ठेवणे त्यासाठी प्रसंगी सरधोपट मार्गाचा त्याग करणे व युक्तीने मार्ग काढणे गरजेचे असते.

माकडापेक्षा आपल्याकडे फक्त १.६ टक्के वेगळ्या जीन्स असतात पण तेवढ्याने आपण 'मंकी नीड्स' किंवा 'मनकी नीड्स' - मनाची हाव  याच्या पलीकडे जाऊन experiment ,exploration, emotions याच्या सहाय्यने समाजासाठी काम केले पाहिजे.

त्यानंतर आपल्याला भेटले - **सोनम वांगचुक** लदाख सारख्या दुर्गम ठिकाणी राहून स्वतः मेकॅनिकॅल इंजीनियर असतानाही (SECMOL- Student's educational and cultural movement of Ladhakh) ही आगळी वेगळी शाळा चालवणारे .लदाख मध्ये ९५ टक्के मुले दहावीत नापास होत होती . या परिस्थितीने व्यथित होऊन फक्त नापास मुलांसाठी वेगळ्या प्रकारची शाळा त्यांनी काढली. ते म्हणाले दुसऱ्याला शिकवणे हे शिकण्याचे उत्तम साधन आहे. त्यांच्या शाळेत इतर अनेक नवीन पद्धती तर आहेतच पण इथे मुलेही एकमेकाना शिकवतात. शाळेसाठी मातीच्या पर्यावरण पूरक इमारती बांधता याव्यात म्हणून फ्रेंच शिकून फ्रान्सला जावून त्या विषयातले शिक्षण त्यांनी घेतले. लदाख मधल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी बर्फाचे कृत्रिम स्तूप 'istupa' बांधण्याची चळवळ ते सध्या उभी करत आहेत. स्वतःसाठी काहीतरी साध्य करण्यापेक्षा इतरांसाठी काम करण्याची त्यांची इच्छा आहे.

शनिवार च्या पाहिल्याच पाहुण्या होत्या - **चेतना गाला सिन्हा.** खाण्यापिण्याची आवड असणारी गुजराती जैन घरातली चेतना लग्न होऊन जेव्हा माणदेशात येते आणि तिथली एक गरीब महिला तिच्याकडे बँक तिला खाते उघडू देत नसल्याची तक्रार करते तेव्हा चक्रावूनच जाते. आणि त्या अशिक्षित महिलांसाठी व त्यांच्याच संगतीने 'माणदेशी महिला बँक' हि महिलांची पहिली बँक सुरु करते. महिलांच्या सबलीकरणासाठी त्यांनी निरनिराळे वर्ग सुरु केले आहेत जसे मोबाईल वापरणे , साक्षरता , द्रोण पत्रावळी तयार करणे , फाईल तयार करणे इत्यादी.याला त्या महिलांची 'बी स्कूल ' म्हणतात. 'माणदेशी रेडीओ वाहिनी' हे स्थानिक रेडीओ स्टेशन त्यांनी तेथील महिलांसमवेत सुरु केले आहे. त्या अस मानतात की खर शिक्षण लोकांमध्ये जाऊनच होत.गावात दुष्काळ आला म्हणून त्यांनी छावणी बांधली पण त्या म्हणतात दुष्काळ येऊ नये म्हणून प्रयत्न करणे उदाहरणार्थ बंधारे बांधणे हे जास्त योग्य.

**संगीता धायगुडे** यांनी दहावीनंतर १३ वर्षांनी ज्या जिद्दीने हालअपेष्टांना तोंड देत शिक्षण पूर्ण केले त्याला तोडच नाही. नुकतीच त्यांच्या आत्मचरित्राची 'हुमान' ची पाचवी आवृत्ती प्रसिध्द झाली. अब्दुल कलाम यांचे वाक्य 'स्वप्न ते नाही जे तुम्ही झोपेत पाहता ,स्वप्न ते असत जे तुम्हाला झोपू देत नाही .' हे त्यांना स्फूर्ती देत राहते. पतीच्या निधनानंतर त्या नैराश्याने आत्महत्येच्या टोकापर्यंत जाऊन आल्या पण पतीच्या हस्ताक्षरातील एका हिन्दी गाण्याच्या ओळीनी त्यांना मुलांसाठी जगण्याचे बळ दिले.पुढे त्यांना जेव्हा कळले की MPSC परीक्षेला बसण्याची हि त्यांची शेवटची संधी आहे तेव्हा त्यांनी मुलांची चौथीपासूनची पुस्तके वाचण्यापासून सुरवात केली आणि सकाळी ७ पासून रात्री २ पर्यंत अखंड अभ्यास करून त्या पास झाल्या .यात त्यांच्या मुलांनी लहान असूनही त्यांना खूप मदत केली.

**अभिषेक सेन** हा खरतर एक डॉक्टर पण इंजिनीरिंगची आवड त्याला स्वस्थ बसू देई ना. डॉक्टर होत असतानाच सुई न टोचता हिमोग्लोबिन परीक्षा करण्याचे मशीन बनवायचे त्याने ठरवले. त्यासाठी डॉक्टर झाल्यानंतर त्याने IIT तून Biomedical Engineering चे शिक्षण घेतले. . ४ वर्षे व ३४ अपयशे यानंतर त्याला ते बनवण्यात यश आले. 'Journey itself is the destination , so enjoy the journey.' असे तो म्हणतो. त्याने स्थापन केलेल्या ' Biosense Technology Pvt. Ltd' या कंपनी तर्फे स्मार्टफोन वापरून लघवीची चाचणी करणे , स्वस्तातील मधुमेह चाचणी पट्ट्या इत्यादी अनेक नवनवी उपकरणे शोधली जात आहेत. अभय बंग हे त्याचे एक आदर्श आहेत व त्यांच्यासारखे सामाजिक कार्य स्वतः करू शकलो नाही तरी त्यासाठी साधने बनवीन अशी त्याची सदिच्छा आहे.

**संजीव गलांडे** यांना त्यांच्या बायोकेमिस्ट्री या विषयातील संशोधनासाठी शांतीस्वरूप भटनागर हा अतिशय मानाचा पुरस्कार मिळाला आहे. पेशींच्या संशोधनात व्यग्र असणारा हा शास्त्रज्ञ साध्या ,सोप्या भाषेत निरनिराळ्या छोट्या फिल्म्स दाखवून आपले काम समजावून सांगत होता. ते काम करत असलेल्या पुणे येथील 'ISAR' या संस्थेची त्यांनी मुलांसाठी विस्तृत माहिती दिली. बारावीत प्रवेश परीक्षा देऊन मुले इथ येतात . येथील जागतिक दर्जाच्या कोट्यावधीच्या सामुग्रीवर त्यांना प्रत्यक्ष काम करता येते. दहावीनंतर प्रयोगशाळेत काम करण्यासाठी 'inspire' या स्कॉलरशिप बद्दलही त्यांनी माहिती दिली. ते म्हणाले शास्त्रज्ञ होण्यासाठी चिकाटी हा गुण अत्यावश्यक आहे.

**सुनील खांडबहाले** या अशिक्षित घरात जन्मलेल्या मुलाने खांडबहाले डॉट कॉम हा तेवीस भाषांचा शब्दकोश असलेली वेबसाईट तयार केली आहे ती कहाणी फारच रोचक आहे. आज जगातले एकशे पंधरा देशातले तेरा कोटी लोक हा शब्दकोश वापरत आहेत. दररोज त्यावर दहा लाख शब्दांचा शोध घेतला जातो.

दुसऱ्याकडून मागून आणलेल्या पुस्तकांवर त्यांचे शिक्षण झाले. इंजिनीरिंग चा फॉर्म भरताना 'जेन्डर ' या शब्दाचा अर्थ न कळल्याने 'फिमेल' शब्दावर खूण केली इतके त्यांना इंग्लिश समजत नव्हते. तेव्हाच त्यांची डिक्शनरीशी ओळख झाली. पुढे कॉम्प्युटरवर डिक्शनरी घालण्यासाठी सहा महिने दिवस रात्र एक करून त्यांनी कॉम्प्युटच्या सर्व भाषा शिकल्या. यात अति ताणाने पाठीचे ऑपरेशनही करावे लागले. १९९९ मधेच त्यांनी सर्च इंजिन शोधले होते पण तेव्हा योग्य माहिती व मार्गदर्शना अभावी त्यांना प्रसिद्धी मिळाली नाही.

सध्या नाशिक कुंभमेळा सुरळीत होण्यासाठी तेथील तरुण व अमेरिकेतील हार्वर्ड ,येल अशा ठिकाणचे भारतीय यांच्यात समन्वय साधून ते मोठे काम उभे करत आहेत.

**गुरु ठाकूर** यांना आज आपण लेखक व कवि म्हणून ओळखतो . पण चित्र काढणे हि त्यांची पहिली आवड होती व त्यांचे शिक्षण तर कॉमर्स क्षेत्रातले आहे हे ऐकून आश्चर्यच वाटले. कलेच्या क्षेत्रात वावरता वावरता अचानक एकदा अजय-अतुल यांच्या सांगण्यावरून चालीवरून 'मन उधाण वाऱ्याचे' हे गाणे लिहून दिले व त्यानंतर 'अगबाई अरेच्या ', 'नटरंग' अशा अनेक चित्रपटांसाठी गाणी लिहिली.

शनिवारच्या या भरगच्च कार्यक्रमानंतर रविवारीही असेच अनेक दिग्गज लोक भेटले.

**सुश्रुत मुंजे** हा एक तरुण उद्योजक .नवीन नवीन शिकतच पुढे जाणार आहे हि त्याची जिद्द आहे.

इंजिनिअरींग मध्ये मन न रमल्याने २ वर्षानंतर कॉलेज सोडून दिले. काय करावे ठरत नव्हते. लेखनाची आवड होती म्हणून एक मासिक काढले पण तेही ४ महिन्यातच बंद करावे लागले.वाचन चालू होते. त्या दरम्यान 'Rich Dad Poor Dad' या पुस्तकाचा व उद्योजकतेच्या विचारांचा खूप प्रभाव पडला. मग त्याने 'On Time' नावाने repair and Maintenance service सुरु केली. पुढे brandname मुळे खूप फरक पडतो असे वाटल्याने नाव बदलून 'hammer and mop' असे आकर्षक व समर्पक नाव ठेवले. सुरवातीच्या अडचणींवर मात करत आता भरपूर लहान ,मोठे, प्रसिध्द ग्राहक त्याला मिळतात. पूर्वी त्याला वाटत असे की बिझनेस मध्ये आपण कोणालाच उत्तर द्यायला बांधील नसतो पण प्रत्यक्ष काम केल्यावर कळले की खरतर त्यात आपण सगळ्यांनाच बांधील असतो.

त्यानंतर **सोनल निम्भोरकर** हि नेव्हीतील डॉक्टर आणि **गुरलीन कौर वाधवा** हि आर्मीतील ऑफिसर या दोन हसतमुख तरुणींशी भेट झाली. सोनलचे वडीलही आर्म्ड फोर्सेस मधेच आहेत व गुरलीनची तर हि चौथी पिढी आहे सैन्यातली , दोघींचे पतीही सैन्यातीलच आहेत. दोघींनी सैन्यातील प्रवेश, प्रशिक्षण याबद्दल विस्तृत माहिती दिली. त्यांना आपल्या कामाबद्दल खूप अभिमान व आत्मीयता दिसली.

नंतर टी.व्ही. फेम सुप्रसिद्ध **शेफ देवव्रत जातेगावकर** यांनी मुलाखतीबरोबर एक अप्रतिम प्रात्यक्षिक दाखवले. कलिंगडावर आय. पी. एच. चे चिन्ह कोरून भोवताली सुरेख फुलासारखी नक्षी कोरली. त्यांच्या बटर वापरून केलेल्या कलाकृतीला आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाला आहे. त्यांचा चॉकलेटचा बंगला व इतरही सुन्दर कलाकृतींचे फोटो त्यांनी दाखवले.

**डॉक्टर माया तुळपुळे** या पेशाने खरेतर सर्जन त्यांना स्वतःला कोड आल्यामुळे , अशा व्यक्तींना कोणकोणत्या दिव्यातून जावे लागते याची कल्पना आली. मग त्यांनी कोड आलेल्या व्यक्तींचा स्वमदत गट 'श्वेता' स्थापन केला. इतकच नव्हे तर त्यांच्यासाठी वधूवर सूचक मंडळही सुरु केले. त्याबरोबरच 'नितळ' हा कोडाबद्दलचे गैरसमज दूर करणारा चित्रपटही काढला.

सुप्रसिद्ध **अभिनेते सचिन खेडेकर** यांची मुलाखत हा कार्यक्रमाचा कळसाध्याय होता. त्यांच्या 'सुभाषचंद्र बोस', 'संविधान' मधील बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका , काकस्पर्श व मी शिवाजीराजे भोसले बोलतोय या चित्रपटातील अंश दाखवण्यात आले. त्यानंतर त्यांनी भूमिकेचा अभ्यास कसा केला व भूमिका करताना काय अनुभव आले ते सांगितले. डो. नाडकर्णींनी त्यांना 'विचारवंत अभिनेता' असे विशेषण बहाल केले. बोसांची भूमिका करण्यासाठी आधीचे सर्व अभिनय शिक्षण विसरून जा असे त्यांना श्याम बेनेगलनी सांगितले. २ वर्षे त्यांनी पूर्णपणे त्याच कामासाठी दिली. त्यामुळेच ते काम अगदी अस्सल झाले असे त्यांना वाटते.

हे ठाण्यातील वेध चे तेविसावे वर्ष होते व महाराष्ट्रातील हा चौपन्नवा वेध होता. आय. पी. एच. ला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने ऑडीओ व्हिजुअल विभागाचा **सचिन गावकर** हा जानेवारीपासून भारतातील पंचवीस राज्यांची सायकलवरून परिक्रमा करणार आहे . मानसिक आरोग्याची जाणीव,जागृती निर्माण करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. त्या अनुभवातून तो आणखीही काही काम उभे करू इच्छितो. त्याला सर्वांतर्फे शुभेच्छा देण्यात आल्या.

इच्छा ते पूर्ती या प्रवासाचा एक वस्तुपाठ आम्हाला इथे एका वेगळ्या पद्धतीनेही पाहायला मिळाला.

वेध व्यवस्थित व्हावा हि सर्वांची इच्छा होती. पण शनिवारी मध्यरात्री धो धो पाऊस कोसळला. मैदान चिखलाने भरून गेले. सेटचे खूप नुकसान झाले. पण वेध टीमची जिद्द , चिकाटी, परिश्रम करायची तयारी यामुळे त्यांनी त्यावर मात केली. पुन्हा पाऊस आला तर काय करायचे याचे व्यवस्थित नियोजन केले व ते प्रेक्षकांना सांगितले. (तरुणांनी ज्येष्ठांना आधी आडोशाला जाऊ द्यावे, व खुर्च्यांचे १० चे गट रचून बाजूला सरकवून ठेवावे इत्यादी.) कार्यक्रम योजल्याप्रमाणे करण्याचे साहस दाखवले. पण ते वेडे साहस नव्हते.

वेधचे वेड मात्र ठाणेकरांमध्ये पुरेपूर भिनलेले आहे. खरतर वेधची डीव्हीडी आता मिळते . पण तरीही दरवर्षी तीन साडेतीन हजार मुलं, पालक, शिक्षक वेधची अगदी चातकासारखी वाट पाहत असतात. डॉ. आनंद नाडकर्णींनी घेतलेल्या आगळ्या वेगळ्या व्यक्तींच्या मुलाखती ,वेळोवेळी होणारा टाळ्यांचा कडकडाट व उभे राहून दिली जाणारी मानवंदना , मुलाखती नंतर होणारी खास वेधची गाणी, चहा ,बटाटेवड्याचा खमंग दरवळ , डीसेम्बरची हलकीशी थंडी हा सगळा माहौल डीव्हीडीत कसा मिळणार ? यामुळे पुढच्या वर्षीच्या 'वेध' चे वेध सर्वांना आत्ताच लागले आहेत.